२७ वा
वार्षिक अहवाल
आर्थिक वर्ष २०२२-२३

# नाते अतुट विश्वासाचे




| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल - ५.१७ करोड | राखीव व इतर निधी - ३५.६६ करोड | शुद्ध मुल्य - ३९.१० करोड |
| ठेवी - २९७.९६ करोड | कर्ज - १८३.८९ करोड | गुंतवणूक - १२९.१४ करोड |
| व्यवसाय - ४८१.८५ करोड | नफा - ६.५७ करोड | सी.आर.ए.आर - २१.१६% |
| ग्रॉस एन.पी.ए. - ०.५७% | नेट एन.पी.ए. - ०% | ऑडीट वर्ग - 'अ' |

महाराष्ट्र शासन द्वारा 'सहकार निष्ठ' व 'सहकार भूषण' पुरस्काराने सन्मानित बँक

सेवा, संचय, प्रगती

सन्मानाने बँकिंग

## अभिनंदन अर्बन को-ऑप. बँक लि.

मुख्य कार्यालय : प्रभात चौक, अमरावती. फोन: ०७२१-२६७७४०१, २५६३४५०

# वंदे मातरम्

वंदे मातरम् ।
सुजलां सुफलां मलयजशीतलाम्
सस्य श्यामलां मातरम् ।
वंदे मातरम् ।।
शुभ्र ज्योत्स्ना पुलकित यामिनीम् ।
फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम् ।
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम् ।
सुखदांम् वरदाम् मातरम् ।
वंदे मातरम् ।।

अभिनंदन अर्बन को-ऑप. बँक लि.

# भारतीयांसाठी अभिमानाचा क्षण

## ऐतिहासिक : चांद्रयान ३ चे यशस्वी प्रक्षेपण



दिनांक १४ जुलै २०२३ रोजी आंध्रप्रदेशातील श्रीहरिकोट्टा येथील इस्त्रोच्या सतिश धवन अवकाश तळावरुन दुपारी २.३५ वाजता एलव्हीएम-एम४ या प्रक्षेपक रॉकेट द्वारे चांद्रयान- ३ चे यशस्वी लॉन्चिंग करण्यात आले. चांद्रयान - ३ चा चंद्राच्या दिशेने प्रवास सुरु झालाय. चांद्रयान - ३ मध्ये सहाचाकी लँडर आणि रोव्हर आहे. रोव्हर चंद्रावर माती आणि दगडाचा अभ्यास करणार आहे. मॉड्युल पासून लँडरच वेगळं होणं तसेच लँडिंगच्या वेळी गती नियंत्रण हे सगळे अवघड टप्पे असतील, याची कल्पना प्रोजेक्ट डायरेक्टर पी. वीरामुथूवेल यांनी दिली आहे. ''चांद्रयान - ३ मोहिम यशस्वी झाली की, भारत दक्षिण ध्रुवावर लँडिंग करणारा जगातला पहिलाच देश ठरेल. चंद्रावरचे शोध विक्रम लँडरच्या माध्यमातून लावता येणार. चंद्रावरच्या साऊथ पोलवर विक्रम लँडर लँड होणार आहे. पृथ्वीभोवती ५ वेळा फिरून नंतर चांद्रयान - ३ चंद्राकडे झेपावणार आहे'' असे लीना बोकील यांनी सांगितलं. २३ किंवा २४ ऑगस्टला चांद्रयान चंद्राच्या पृष्ठभागावर लँड करेल अशी माहिती रॉकेट वुमन ऑफ इंडिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रितु कारिधाल यांनी दिली.

# अभिमानास्पद आणि भूषणावह - G20 2023 चे अध्यक्षपद भारताकडे




**G20** म्हणजे GROUP OF 20 हा जगातल्या प्रमुख विकसित आणि विकसनशील देशांचा राष्ट्रगट आहे. विकसनशील आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांना सामावून घेऊन जगाच्या अर्थव्यवस्थेला स्थिरता देणे हा या गटाचा उद्देश आहे. G20 राष्ट्रगटात भारतासह अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रांस, जर्मनी, इंडोनेशिया, इटली, जपान, दक्षिण कोरिया, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्की, ब्रिटन, अमेरिका अशा १९ देशांचा समावेश आहे. युरोपियन युनियन ही संघटना या राष्ट्रगटातला २० वा सदस्य आहे.

१९९९ साली या राष्ट्रगटाची स्थापना करण्यात आली होती. पूर्व आशिया आणि आग्नेय आशियात १९९७ साली आलेल्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर G20 गट उदयास आला. अशा एखाद्या जागतिक आर्थिक संकटाचा सामना करण्यासाठी प्रमुख देशांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत हा त्यामागचा हेतू होता. सुरुवातीला केवळ या देशांचे अर्थमंत्री आणि तिथल्या केंद्रीय




बँकांचे गव्हर्नर एकत्र येऊन आर्थिक प्रश्नांवर चर्चा करायचे. २००८ च्या आर्थिक संकटानंतर या देशांचे राष्ट्रप्रमुख दरवर्षातून एकदा G20 लीडर्स समिट म्हणजे राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेत सहभागी होऊ लागले.




मा. नरेंद्रजी मोदी
पंतप्रधान, भारत सरकार

विद्यमान अध्यक्ष आधीचे आणि पुढचे अध्यक्ष राष्ट्र यांच्या मदतीने कारभार चालवतात. G20 - 2023 चे अध्यक्षपद भारताकडे आहे. भारत यंदा इंडोनेशिया आणि ब्राझीलच्या मदतीने G20 चा कारभार पाहील.

भारताचे **G20** चे ''वसुधैव कुटुम्बकम'' - ''एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य'' हे घोषवाक्य आहे.

सेवा, संचय, प्रगति
अभिनंदन अर्बन को-ऑप. बँक लि.

# संचालक मंडळ

## कार्यकाळ २०२१-२०२६



हुकमचंद पा. डागा
संस्थापक व संचालक



ॲड. विजय एस. बोथरा
अध्यक्ष



डॉ. सुरेंद्र एस. बरडिया
उपाध्यक्ष

## संचालक



सुदर्शन पु. गांग



राजेंद्र चं. सिंघई (जैन)



राजेंद्र ह. भंसाली



कंवरीलाल न. ओस्तवाल



किशोर हु. बोकरिया



ॲड.गौरव रा. लुनावत



नविन पा. चोरडीया



सौ. सरला वि. भंसाली



श्रीमती. किरण मि.जैन



अरुण कृ. कडू



सुनिल वा. सरोदे



शंकर म. शिंदे



शिवाजी जी. देठे
मुख्य कार्यकारी अधिकारी



अनिल एस.उगले
उप मुख्य कार्यकारी अधिकारी

सेवा, संचय, प्रगति

अभिनंदन अर्बन को-ऑप. बँक लि.

# व्यवस्थापन मंडळ

## कार्यकाळ २०२१-२०२६



**सुदर्शन पु. गांग**
अध्यक्ष



**ॲड. विजय एस. बोथरा**
सदस्य



**हुकमचंद पा. डागा**
सदस्य



**ॲड. भारतप्रकाश रू. खजांची**
सदस्य



**श्रेणिक प्र. बोथरा (सी.ए.)**
सदस्य



**शितलकुमार प्र. लुनावत**
सदस्य



**शिवाजी जी. देठे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

# २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
# (फक्त सभासदांकरिता)

अभिनंदन अर्बन को–ऑप. बँक लि., अमरावतीच्या सर्व सन्माननीय भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, आर्थिक वर्ष २०२२–२३ ची २७ वी वार्षीक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०६ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी ठिक ३.३० वा. श्री जैन छात्रालय, मालटेकडी रोड, बस स्टँड च्या बाजुला, अमरावती येथे बँकेचे अध्यक्ष ॲड. विजयजी बोथरा यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी संपन्न होणार आहे, तरी बँकेच्या सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

**विषय पत्रिका :**

१. दि. १४ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. बँकेच्या दि. ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल वाचून त्यास मंजुरी देणे.
३. बँकेच्या दि. ३१ मार्च २०२३ अखेरचा नफा–तोटा, ताळेबंद पत्रकास मंजुरात देणे.
४. बँकेच्या संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दि. ३१ मार्च २०२३ अखेरच्या नफा वाटणीस मंजूरात देणे.
५. बँकेच्या आर्थिक वर्ष २०२२–२३ चा वैधानिक लेखापरिक्षकांचा अंकेक्षण अहवाल व दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
६. आर्थिक वर्ष २०२३–२४ करीता वैधानिक लेखा परिक्षणासाठी बँकेच्या संचालक मंडळाने रिझर्व बँकेला शिफारस केलेल्या सनदी लेखा परिक्षकांची नोंद घेणे.
७. बँकेच्या आर्थिक वर्ष २०२४–२५ करीता अंतर्गत हिशेब तपासणीसाठी अंतर्गत लेखा परिक्षकाची तसेच इतर सर्व प्रकारचे लेखापरिक्षणांसाठी लेखापरिक्षकाची निवड करणे व त्यांचा मेहनतांना ठरविणे.
८. वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करून मान्यता देणे.
९. बँकेच्या वार्षिक विकास आराखड्यास व दिर्घ मुदती विकास आराखड्यास मंजुरात प्रदान करणे.
१०. बँकेच्या आर्थिक वर्ष २०२२–२३ मधील मंजुर अंदाज पत्रकापेक्षा कमी/जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व आर्थिक वर्ष २०२३–२४ च्या अंदाज पत्रकास मंजूरात देणे.
११. सभासदांकरीता देण्यात येत असलेल्या शिक्षण व प्रशिक्षणाची नोंद घेणे व सभासदांना प्रशिक्षण देण्याबाबत निर्णय घेणे.
१२. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईकांकडे आर्थिक वर्ष २०२२–२३ मध्ये येणे बाकी कर्जाची माहिती घेणे.
१३. आर्थिक वर्ष २०२२–२३ मध्ये एक रकमी कर्ज परतफेड योजनेत तडजोड केलेल्या कर्ज खात्यास मान्यता देणे.
१४. कर्मचारी सेवा निमयांमध्ये बदल करण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.
१५. मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

दि. १९/०७/२०२३
ठिकाण : अमरावती

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
(शिवाजी देठे)
मुख्य कार्यकारी अधिकारी

## भागधारकांना नम्र विनंती / विशेष सुचना

* गणसंख्या अभावी सभा तहकुब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच विषयांवर त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर ४ वाजता घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
* अहवाल, नफा–तोटा पत्रक, ताळेबंद व सभेच्या सुचनेमधील विषया बाबत सभेमध्ये काही प्रश्न विचारावयाचे असल्यास भागधारकांनी दि.०१/०८/२०२३ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे लेखी विचारणा करावी.
* दि.६ ऑगस्ट २०२३ रोजी वार्षिक सर्व साधारण सभा समाप्ती नंतर/दरम्यान बँकेच्या मा. भागधारकांकरीता बँके तर्फे बँकींग प्रशिक्षण देण्यात येईल.
* सर्व सन्माननीय भागधारकांना विनंती करण्यात येते की, आपला मोबाईल नंबर व ई–मेल आयडीची बँकेकडे नोंद करावी म्हणजे बँकेला डिजीटल वार्षिक अहवाल पाठविता येईल.

# सहकार तत्वे

१. ऐच्छिक व खुले सभासदत्व

२. लोकशाही पध्दती

३. भांडवलावर मर्यादित व्याज

४. किमान लाभ व त्याची समान वाटणी

५. सहकार संबंधी शिक्षण व प्रशिक्षण

६. सहकारान्तर्गत सहकार

७. सामाजिक बांधिलकी

## अभिनंदन अर्बन को-ऑप.बँक लि.अमरावती

## परिशिष्ट - अ

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नांव | : | अभिनंदन अर्बन को-ऑप. बँक लि. |
| नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | : | प्रभात चौक, अमरावती |
| नोंदणी क्रमांक व तारीख | : | ए.टी.आय./ए.टी.आय./बी.एन.के.(ओ) ३११/९७/दिनांक ३१.०३.१९९७ |
| रिझर्व बँक परवाना क्र. व तारीख | : | युबीडी.महा.१५४७ पी/दि. ११.०२.१९९८ |
| मुख्य कार्यालय + शाखा | : | ९ |
| सभासद संख्या | : | ५४२४ |
| नाममात्र सभासद संख्या | : | ३३७ |

## दि. ३१ मार्च २०२३ अखेरचा तपशिल : आकडे लाखात

| | | |
|---|---|---|
| वसुल भाग भांडवल | : | ५१७.१७ |
| एकूण गंगाजळी व निधी | : | ३५६६.२२ |
| बचत ठेव | : | ६३९०.१२ |
| चालू ठेव | : | २०१४.१९ |
| मुदत ठेव | : | २१३९१.७१ |
| एकूण ठेवी | : | २९७९६.०२ |
| तारणावर दिलेले कर्ज | : | १८३२५.२५ |
| विना तारण दिलेले कर्ज | : | ३.७७ |
| एकूण कर्ज | : | १८३८९.०२ |
| अग्रक्रम क्षेत्र कर्ज - १२६५७.२९ लाख | : | ७७.३८ % |
| दुर्बल घटक कर्ज - ३३००.५४ लाख | : | २०.१८ % |
| गुंतवणूक | : | १२९१४.४० |
| ऑडीट वर्ग | : | 'अ' |
| नफा (२०२२-२३) | : | ६५७.५३ |
| ग्रॉस एन.पी.ए. | : | ०.५७% |
| नेट एन.पी.ए. | : | ०.००% |
| भांडवल पर्याप्तता प्रमाण (C.R.A.R.) | : | २१.१६% |

एकूण कर्मचारी : ७० | अधिकारी वर्ग : ३२ | लिपीक वर्ग : २४ | शिपाई/वॉचमेन : १४

# मा. अध्यक्षीय मनोगत...



सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो,

सप्रेम नमस्कार

जय सहकार

विना सहकार नाही उद्धार! ह्या सहकाराच्या ब्रिदवाक्याचा उद्घोष करून व्यक्तिशः व बँकेच्या सर्व संचालक मंडळाच्या वतीने २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस प्रत्यक्ष उपस्थित सन्माननीय भागधारकांचे मनःपूर्वक स्वागत करतो. काळाच्या गरजेनुसार डिजिटल मीडिया जसे FACEBOOK, YOUTUBE या प्लॅटफॉर्मद्वारे मागील ५ वर्षांपासून सभासदांसाठी लाईव्ह सेवा उपलब्ध करत आहोत तेव्हा आभासी सहभागी असलेल्या सभासदांचे देखील या प्रसंगी आम्ही सहर्ष स्वागत व अभिनंदन करतो.

आर्थिक वर्ष २०२२-२३ हे वर्ष आपल्यासाठी विशेष महत्वाचे आहे, गेल्या आर्थिक वर्षी आपल्या बँकेने बँकेचे रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संपूर्ण वर्षभर अनेक कार्यक्रम आयोजित केलेत ज्याचा समारोप दिनांक ११ डिसेंबर २०२२ रोजी मा. श्री मंगलप्रभातजी लोढा (मंत्री पर्यटन, कौशल्य विकास व उद्योजकता, महाराष्ट्र शासन) तसेच निवृत्त न्यायाधीश उच्च न्यायालय (महाराष्ट्र राज्य ) व मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष मा. जस्टीस श्री. के. के. तातेड यांच्या समवेत आमदार मा. सौ सुलभाताई खोडके, आमदार मा. रवीजी राणा, माजी अर्थ राज्यमंत्री मा. श्री. डॉ. सुनिलजी देशमुख आणि मा. श्री अनिलजी कवडे सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांचे प्रमुख उपस्थित संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे संपन्न झाला. या प्रसंगी अति उपयुक्त अशा बँकिंग माहितीसह बँकेची २५ वर्षांची यशस्वी वाटचाल दर्शवणाऱ्या सर्व समावेशक अत्यंत सुबक व सुलभ आणि ग्राहकांना बँकींगची माहिती समजण्यास सोपे व इतर बाबींचा समावेश असलेली माहितीपूर्ण **'अर्थसरिता'** या स्मरणिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. **'अर्थसरिता'** ही स्मरणिका प्रकाशित करण्याची कल्पना आपल्यातील अभ्यासू व्यक्तीमत्व व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष व संचालक श्री. सुदर्शनजी गांग यांची होती जी संपादकीय समितीने प्रत्यक्षात आणली हे मला येथे विशेषतः नमूद करतांना अत्यानंद होत आहे. आपल्या सर्व सभासदांच्या व बँकेच्या खातेदारांच्या अढळ विश्वासाने व अचूक नात्याने आपल्या बँकेने २५ वर्षांचा कालखंड पूर्ण केलेला आहे या कालखंडात बँकेने उत्कृष्ट कामकाज करून प्रगतीचे अनेक टप्पे पार करत प्रगतीचा आलेख उंचावत ठेवलेला आहे. बँकेचा आज सर्वत्रच मोठा नावलौकिक झालेला असून बँकेच्या याच उत्कृष्ट कामकाजासाठी बँकेला स्थानिक, विदर्भ, राज्य व राष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्काराने सन्मानित झालेली आहे. एकजुटीने व एकमेकांच्या सहकार्यपूर्ण मार्गदर्शनाने उभा असलेला अभिनंदन बँक परिवार आता सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल करण्याकरिता सज्ज झालेला आहे. संस्थापक व संचालक मा. श्री. हुकमचंदजी डागा, उपाध्यक्ष मा. श्री डॉ सुरेंद्रजी बरडीया, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सुदर्शनजी गांग, माजी व विद्यमान संचालक मंडळाचे सर्व संचालक यांनी अनेक प्रसंग अनुभवत आपले कार्य चोख बजावल्यामुळे आज आपल्या ८ शाखा मोठ्या डौलाने बँकिंग क्षेत्रात आपले महत्वपूर्ण व सर्वोच्च योगदान देत कार्यरत आहेत तसेच आपल्या बँकेच्या स्वतःच्या कॅम्प रोड स्थित अभिनंदन हाईट्स चे बांधकामाचे कार्य हे पूर्णत्वास येत असून लवकरच सुसज्ज तसेच नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून ग्राहकांच्या सेवेत येणार आहे. या प्रसंगी आपणास सांगण्यात अतिशय आनंद होत आहे कि, बँकेची नववी शाखा वरुड येथे उघडण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने मंजुरात प्रदान केलेली आहे. सदर नवीन शाखा ही पोलीस स्टेशन समोर, वरुड जि. अमरावती येथे लवकरच सुरु करून ग्राहक सेवेला प्रारंभ करणार आहे. या विकासात्मक उपलब्धी संबंधी मी आपल्या सर्वांचे अभिनंदन करतो.

आम्हाला येथे नमूद करतांना आनंद होत आहे की, या आर्थिक वर्षात बँकेने चांगला बँकिंग व्यवसाय करीत ग्रॉस NPA ०. ५७ % तर नेट NPA चे प्रमाण निरंतर सालाबादाप्रमाणे ०% ठेवण्यात यशस्वी झालो आणि याच बरोबर आपला २०२२-२३ चा वार्षिक प्रगतीचा आलेख हा पुन्हा उच्चस्थानी कायम ठेवण्यात आपण निश्चितच यश मिळवलेले आहे. अभिनंदन बँक परिवाराने २०२२-२३ मध्ये खालील प्रमाणे प्रगतीचे टप्पे साध्य केले.

- वैधानिक लेखा परीक्षणांत 'अ' वर्ग प्राप्त
- GROSS NPA चे प्रमाण गतवर्षीच्या तुलनेत कमी झाले असून ते ०.५७% इतके आहे
- सालाबादाप्रमाणे नेट NPA चे प्रमाण हे ० % आहे
- बँकेचा एकूण व्यवसाय ₹४८१.८५ कोटी (प्रति कर्मचारी ₹६.८८ कोटी इतका व्यवसाय)
- एकूण ठेवी ₹२९७.९६ कोटी
- एकूण कर्जे ₹१८३.८९ कोटी
- CD RATIO ६१.७२%
- नफा ₹६.५७ कोटी (प्रति कर्मचारी ₹९.३९ लाख नफा)
- बँकेची गुंतवणूक ₹१२९.१४ कोटी
- भागभांडवल ₹५.१७ कोटी
- CRAR – २१.१६ %

समाजाप्रती आपल दायित्व हे असायलाच हवं कारण समाजाचं आपण काहीतरी देणं लागतो तसेच बँकिंग व्यवसाय समाजाभिमुख असला पाहिजे याची जाण बँकेच्या संचालक मंडळाने बँकेच्या स्थापनेपासून जोपासलेली आहे. त्या दृष्टीकोनातून नेहमी वेगवेगळ्या सेवा कार्यात अभिनंदन बँकेचे संचालक मंडळ व कर्मयोगी कर्मचारी अग्रेसर राहिलेले आहेत. सामाजिक कार्याच दायित्व म्हणून यापूर्वी बँकेने विविध कार्यक्रमांचे जसे वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, श्रमदान, जलसेवा, देहदान व नेत्रदान करण्याविषयीची जनजागृती, पर्यावरण बचाव, महाविद्यालयीन विद्यार्थी व मकर संक्रान्ती निमित्त हळदी कुंकू या कार्यक्रमाचे आयोजन करून गृहिणी यांच्याकरिता बँकिंग जागरूकता, वैद्यकीय तपासणी शिबीर व अनेक कार्यशाळेचे आयोजन, असे बरेच उपक्रम राबविलेले आहेत. या आर्थिक वर्षी अमरावती पोलीस उपायुक्त श्री. विक्रम साळी व त्यांचे सहकारी यांची काश्मीर ते कन्याकुमारी आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा ही माहे डिसेंबर २०२२ मध्ये संपन्न झाली ज्याचे प्रायोजकत्व आपल्या अभिनंदन बँकेने केले होते.

आयकर विभाग, नागपूर यांचे द्वारे बँकेच्या मुख्य कार्यालयातील अभिनंदन सभागृहात अमरावती विभागातील नागरी सहकारी बँकांसाठी आयकर संबंधी कार्यपद्धती या विषयावरचे प्रशिक्षण आयोजित केले होते. ज्यामध्ये आयकर विभागाचे संचालक (I & CI) नागपूर चे श्री संदीपकुमार साळुंके (IRS) तसेच आयकर विभागाच्या अतिरिक्त संचालीका (I & CI) श्रीमती कौमुदी पाटील (IRS) आणि सोबत उपस्थित आयकर विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित सहकारी बँकांचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच आयकर संबंधित काम पाहणारे अधिकारी वर्ग यांना मार्गदर्शन केले. बँकचे कार्य हे योग्य, अद्यावत माहितीच्या आधारावर नियोजन पद्धतीने असले पाहिजे या करीता बँकेद्वारे संचालक व कर्मचारी यांना दरवर्षी भारतीय रिझर्व्ह बँक, महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक फेडेरेशन मुंबई, महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक असोसिएशन मुंबई व इतर आर्थिक संस्थांद्वारे आयोजित ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीच्या प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. आपण सर्व जाणतोच की, तंत्रज्ञान जसे वरदान आहे तसेच शाप पण आहे कारण ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणाऱ्या व्यवहारामुळे CYBER SECURITY ला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे याच मुळे INFORMATION SECURITY बद्दलचे प्रशिक्षण सोबतच बँकिंग बद्दलचे एकदिवसीय प्रशिक्षण हे बँकेच्या मुख्य कार्यालयात तर दुसरे दिवशी तपोवन रोड अमरावती स्थित डॉ. पंजाबराव देशमुख प्रशिक्षण प्रबोधिनी येथे एकदिवसीय प्रशिक्षण हे संचालक व कर्मचारी यांचेसाठी माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये आयोजित करण्यात आले ज्याचे प्रशिक्षण हे त्यामधील तज्ञ व्यक्तींकडून सविस्तर रित्या देण्यात आले. बँकेच्या प्रगती साठी या सर्व विविध प्रशिक्षणांचा निश्चितच उपयोग होईल. आर्थिक वर्ष २०२२–२३ मध्ये बँकेला आर्थिक वर्ष २०२१ –२२ करीता बँकेच्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल महाराष्ट्र अर्बन को. ऑप बँक फेडरेशन, विदर्भ अर्बन को. ऑप बँक असोसिएशन , बँको आणि बँकिंग फ्रन्टिएअर्स तर्फे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे.

शेवटचे पण अती महत्वाचे, बँकेच्या यशामध्ये संमिलित असलेल्या सर्व भागधारक, ग्राहक, कर्मचारी व हितचिंतकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले याबद्दल कृतज्ञातापूर्वक आभार!

**सहर्ष धन्यवाद!**

**जय हिंद! जय सहकार!!**

# आर्थिक स्थितीचा आढावा

**सभासद भागभांडवल :** बँकेचे दि. ३१ मार्च २०२३ रोजी भागभांडवल रू. ५१७.१७ लाख असून बँकेचे भागधारक संख्या ५४२४ व नाममात्र सभासद संख्या ३३७ असून त्याची रक्कम रू. ३३,७०० आहे.

**राखीव निधी :** राखीव निधीची उभारणी ही सहकारी कायद्यानुसार एकूण निव्वळ नफ्याचे २५% करणे आवश्यक आहे. अहवाल वर्षात बँकेच्या राखीव निधीत रू. ९१.४५ लाखाने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०२३ च्या अखेरीस बँकेचा एकूण राखीव निधी रू. ८३७.२५ लाख झाला आहे. बँकेच्या राखीव निधीतील वाढ ही आर्थिक सक्षमतेचे निदर्शक असल्यामुळे यावर्षी देखील या निधीपोटी रू. १ करोड ५ लाख नफ्यातुन तरतूद सुचविली आहे.

**इमारत निधी :** बँकेला स्वतःची इमारत बांधण्यासाठी/खरेदी करण्यासाठी ह्या निधीच्या उभारणीचा मुख्य उद्देश आहे. हा निधी भांडवल निधी म्हणून धरला जातो. बँकेच्या सभासदांना वैयक्तीक व ग्रुप कर्ज मर्यादा ठरवितांना हा निधी वसुल भागभांडवला सोबत धरला जातो. ३१ मार्च २०२३ रोजी बँकेचा इमारत निधी रू. १४८४.२७ लाख इतका आहे. यावर्षी संचालक मंडळाने या निधी पोटी रू. २२२.४६ लाखाची नफ्यातुन तरतूद सुचविली आहे.

**गुंतवणूक चढ–उतार निधी :** आपल्या बँकेने सरकारी प्रतिभूतीमध्ये रू. ११२४९.०२ लाख रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सी.एस.जी.एल. खाते मार्फत गुंतवणूक केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार HFT/AFS मध्ये असलेल्या सरकारी प्रतिभूती मधील गुंतवणुकीवर IFR हा कमीत कमी ५% असायला पाहिजे बँकेची HFT/AFS वर्गवारीत सरकारी प्रतिभूती मध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेल्या गुंतवणुकीचा विचार करता बँकेने ३१ मार्च २०२३ अखेर पर्यंत ह्या निधीची उभारणी रू. २३५.६९ लाख इतकी केली आहे. यावर्षी संचालक मंडळाने नफ्यातुन रू. १४.३० लाखाची तरतूद सुचविली आहे.

**स्टँडर्ड ॲसेटस् तरतूद :** बँकेने रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार रियल ईस्टेट कर्जावर १% प्रमाणे व इतर कर्जावर ०.४०% प्रमाणे स्टँडर्ड ॲसेटस्ची तरतूद चालू वर्षात रू. ९.०१ लाखाने वाढून ती वर्ष अखेर रू. ८८.२४ लाख झालेली आहे.

**ठेवी :** अहवाल वर्षात ठेवी मध्ये १०.४२% ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०२३ अखेर ठेवी रू. २९७९६.०२ लाख आहे. भागधारक, ठेवीदार व हितचिंतक यांचा बँकेवरील विश्वासामुळे बँक लवकरच यावर्षीचे ठेवीचे उद्दिष्ट पूर्ण करून ३४० कोटी ठेवींचा टप्पा गाठण्यात यशस्वी होईल. बँके मधील कासा (CA/SA) ठेवीचे प्रमाण २८.२०% आहे.

**रोख व तरल निधी :** रिझर्व्ह बँक नियमन कायदा १९४९ मधील कलम १८ व २४ नुसार रोख निधी व तरल निधी NDTL च्या अनुक्रमे ४.५% व १८% प्रमाणे राखणे अनिवार्य असून बँकेने आर्थिक वर्षात निकषानुसार निर्देशाचे काटेकोरपणे पालन केले आहे.

**गुंतवणूक :** बँकींग व्यवसायामध्ये बँके कडील ठेवी, कर्ज याच्या इतकाच बँकेची सुयोग्य गुंतवणूक हा सुध्दा तेवढाच महत्वाचा घटक असतो. रिझर्व्ह बँकेने सुचविलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व त्यांच्या सुचनेनुसार बँकेच्या गुंतवणूकीचे धोरण (Investment Policy) ठरविले आहे, त्यामध्ये दरवर्षी रिझर्व्ह बँकेच्या सुचना नुसार बदल केल्या जातो. बँकेची गुंतवणूक करतांना उत्तम तरलता (Immediate Liquidity) सुयोग्य परतावा (Reasonable Profit Return) व कमीत कमी जोखीम (Minimum Risk) या प्रमुख निकषावर केली जाते. दि. ३१ मार्च २०२३ अखेरीस गुंतवणूक रू. १२९१४.४० लाख असून बँकेच्या गुंतवणूकीचे स्वतंत्रपणे लेखा परिक्षण केल्या जाते तसेच सरकारी प्रतिभूतीचा अहवाल रिझर्व्ह बँकेला दर तिमाही नियमित पाठविला जातो. बँकेच्या गुंतवणूकीत केंद्र सरकारचे रोखे (Central Govt. Security)मध्ये गुंतवणूक रू.११२४९.०२ लाख

इतकी असून, स्टेट बँक ऑफ इंडिया, आय.डी.बी.आय. बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा, महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक लि., शामराव विठ्ठल को–ऑप. बँक लि. व शेड्युल बँकेत मुदत ठेवीत रू. १६६५.३८ लाख केलेल्या गुंतवणूकीचा समावेश आहे.

**कर्ज :** दि. ३१ मार्च २०२३ अखेरीस बँकेचे कर्ज एकूण रू. १८३८९.०२ लाख असून मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत बँकेने तुलनात्मक व्याजदर निश्चित केलेले असून त्याचा फायदा बँकेच्या ग्राहकांना होवून आर्थिक वर्षात कर्ज वाटपा मध्ये १२.४२% वाढ झाली आहे. त्याच प्रमाणे रिझर्व्ह बँकेचे मापदंडानुसार अग्रक्रम क्षेत्रास ७७.३८ % व दुर्बल घटकास २०.१८% कर्ज वितरीत केले आहे. बँकेचे कर्ज व ठेवीचे गुणोत्तर प्रमाण सी.डी. रेशो ६१.७२% असून ग्राहकांच्या गरजा ओळखून रिझर्व्ह बँक व सहकार खात्याचे नियमांना अधिन राहून सभासदांना अधिकाधिक कर्ज पुरवठा करण्याचे बँकेचे धोरण आहे. त्याचप्रमाणे MSME करीता एकूण कर्जाच्या ७.५०% कर्ज वितरण करावे असे रिझर्व बँकेने सुचित केले आहे त्यानुसार आपली बँक MSME कर्ज प्राधान्याने वितरित करीत आहे.

**संचालक व त्यांच्या नातेवाईकांकडील कर्ज :** रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेच्या संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक त्यांच्या नावाने असलेल्या ठेवी व एल.आय.सी. पॉलिसी वगळता इतर कर्ज असू नये अशा रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचना आहे त्या निर्देशांचे बँकेने तंतोतंत पालन केले आहे.

**थकबाकी व निव्वळ अनुत्पादित कर्ज (एन.पी.ए.) :** कर्जाच्या थकबाकी मुळे बँकेच्या प्रगतीला आळा बसू शकतो. रिझर्व्ह बँक व सहकार क्षेत्राच्या नियमानुसार बँकेचा एन.पी.ए. कमीत कमी असणे हे बँकेच्या प्रगतीचे व सक्षमतेचे सुचक आहे. अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या मार्गदर्शनामुळे व कर्मचारी वर्गाची नियोजनबद्ध वसुली कार्यवाहीमुळे आपल्या बँकेचे थकबाकीचे प्रमाण ०.८४% तर ग्रॉस एन.पी.ए. चे प्रमाण ०.५७% आहे, नेट एन.पी.ए. गत वर्षाप्रमाणेच ०% आहे.

**निव्वळ नफा व नफ्याचे विनियोजन :** ठेवीदारांना आकर्षक व्याज देण्या सोबतच कर्जदारांनाही अल्प व्याजदराने कर्ज पुरवठा केला असून नियोजनबद्ध सरकारी प्रतिभूतीची गुंतवणूक व खर्चात काटकसर करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६५(१) नुसार आवश्यक तरतूदी करून बँकेने दि. ३१ मार्च २०२३ अखेर रू. ४,११,०४,२११.५६ चा निव्वळ नफा अर्जीत केला आहे. बँक गेल्या १६ वर्षापासून आयकर भरून राष्ट्रीय विकास कार्यात हातभार लावीत असून या आर्थिक वर्षा पर्यंत **आपल्या बँकेने रू. १६ करोड ९१ लाख रक्कमेचा आयकर भरणा केला आहे.** संचालक मंडळाने यावर्षीच्या (सन २०२२–२३) निव्वळ नफ्याचे विनियोजन पुढील प्रमाणे केले आहे.

| नफ्याचे विनीयोजन | |
|---|---|
| निव्वळ नफा | ४,११,०४,२११.५६ |
| राखीव निधी | १,०५,००,०००.०० |
| इमारत निधी | २,२२,४६,४७६.५६ |
| गुंतवणुक चढ उतार निधी | १४,३०,२००.०० |
| सभासद कल्याण निधी | ५०,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | ५०,०००.०० |
| पब्लिक चॅरीटी फंड | २,००,०००.०० |
| आकस्मित नुकसान राखीव निधी | ५,००,०००.०० |
| आधुनिक तंत्रज्ञान निधी | १०,००,०००.०० |
| १०% लाभांश (भागधारक) | ५०,५७,५३५.०० |
| सभासद, संचालक, कर्मचारी शिक्षण व प्रशिक्षण निधी | ५०,०००.०० |
| निवडणुक निधी (संचालक मंडळ) | २०,०००.०० |

**लाभांश :** बँकेने गेल्या २६ वर्षापासून उत्कृष्ट, तत्पर व विश्वसनिय विनम्र बँकिंग सेवा बँकेचे भागधारक व ग्राहकांना देऊन त्यांचा बँकेप्रती विश्वास संपादन केल्यामुळे बँकेची उत्तरोत्तर निरंतर प्रगती होत आहे. बँकेच्या या यशात अर्थातच सिंहाचा वाटा हा भागधारकांचा असतो. हे ध्यानात ठेऊन बँकेने रिझर्व बँकेच्या निर्देशामुळे आर्थिक वर्ष २०१९-२०२० सोडून दरवर्षी भागधारकांना लाभांशाचे वितरण केले आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी संचालक मंडळाची भागधारकांकरीता १०% लाभांश वाटपाची शिफारस असून हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर करताना मला आनंद होत आहे.

**भांडवल पर्याप्तता प्रमाण :** रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार बँकांना आपले भांडवल पर्याप्तता प्रमाण कमीत कमी ९% राखणे बंधनकारक आहे. त्यानुसार आपल्या बँकेचे सदर प्रमाण २१.१६% असून ते बँकेची सक्षम व सुदृढ स्थिती दर्शविते.

**रिझर्व्ह बँक तपासणी :** बँकेचे आर्थिक वर्ष २०१७-१८ व २०१८-१९ ची तपासणी रिझर्व्ह बँकेच्या तपासणी अधिकाऱ्यांनी केली आहे.

**वैधानिक लेखा परिक्षण :** आर्थिक वर्ष २०२२-२३ या कालावधीसाठी बँकेचे वैधानिक लेखापरिक्षण मे. शहा बाहेती चांडक अँड कंपनी, अमरावती यांनी मुदतीच्या आत पूर्ण करून बँकेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले तसेच बँकेच्या निरीक्षणात त्यांनी 'Bank is being governed well. Corporate identity is sound. Bank is being awarded regularly. Bank is on the growth path;' असे मत व्यक्त केले व आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता वैधानिक लेखा परिक्षणाचा **'अ'** वर्ग प्रदान करण्यात आला आहे.

**समवर्ती लेखा परिक्षण :** बँकेचे मुख्य कार्यालय व ८ शाखांचे समवर्ती लेखापरिक्षण मे. जे.एस. खंडेलवाल अँड कंपनी (सी.ए.), आर. आर. खंडेलवाल अॅन्ड कंपनी (सी.ए.), पी.सी. अग्रवाल (सी.ए.), योगेश राठी अँड कंपनी (सी.ए.), गणेश अटल (सी.ए.), प्रकाश वारदे (सी.ए.), श्रेणीक कांकरीया (सी.ए.), आर. बी. भुसारी (सी.ए.), यांनी पूर्ण केले तसेच सर्व शाखांचे अंतर्गत तपासणी मुख्य कार्यालयातील अधिकाऱ्यांनी पुर्ण केले त्यामुळे बँकेच्या कामकाजात आवश्यक सुधारणा करण्यास मदत झाली आहे.

**फ्रँकिंग मुद्रांक विक्री सुविधा :** बँकेस महाराष्ट्र शासनाने फ्रँकिंग मुद्रांक विक्रीचा परवाना दिला आहे. बँकेने नुकतीच सुरक्षिततेचे नविन मापदंड अंतर्भुत असलेली अत्याधुनिक फिचर्स युक्त फ्रँकिंग मशीन ग्राहकांच्या सोयीकरीता घेतलेली असून त्याचे विधीवत उद्घाटन बुधवार दि. १२.०७.२०२३ रोजी मा. श्री. अनिलजी औतकर, मुद्रांक जिल्हाधिकारी, अमरावती यांचे हस्ते करण्यात आले आहे त्यानुसार सदर सुविधा बँकेच्या भागधारक, खातेदार, नागरीक व इतर संस्था, बँका यांना आपल्या बँकेच्या मुख्य शाखा, प्रभात चौक, अमरावती येथे उपलब्ध आहे.

**ई-पेमेंट सुविधा :** बँकेने सर्व नागरीकांकरीता ईलेक्ट्रॉनिक टॅक्स पेमेंट सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेचा आपल्या बँके मार्फत बँकेचे खातेदार व नागरीक रक्कम मोठ्या प्रमाणात त्यांचे टि.डी.एस., जी.एस.टी., इन्कम टॅक्स, सेल्स टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स चलान भरणा करून नमुद सुविधेचा उपयोग घेत आहेत.

**RTGS/NEFT सुविधा :** बँकेच्या सर्व शाखांना RBI कडून HDFC बँके मार्फत IFSC कोड प्राप्त असून बँकेच्या सर्व शाखांमधून नमुद सुविधेचा लाभ ग्राहक खूप मोठ्या प्रमाणावर NEFT, RTGS, IMPS चे व्यवहार करण्यासाठी घेत आहेत. बँकेच्या खातेदारांच्या खात्यावर संगणक प्रणालीद्वारे RTGS/NEFT ची रक्कम थेट खात्यात जमा होत आहे.

**आधार ब्रीज पेमेंट सिस्टीम व नॅशनल ऑटोमेटेड क्लिअरींग हाऊस सिस्टिम (ABPS/NACH) सुविधा :** बँकेने NPCI च्या मान्यतेने बँकेच्या खातेधारकांना आधार ब्रीज पेमेंट सिस्टीम द्वारे LPG सबसिडी, शैक्षणिक शिष्यवृत्ती, सरकारी/निम सरकारी अनुदान रक्कम खात्यात थेट जमा

करण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. शासनाच्या धोरणाप्रमाणे LPG सबसिडीची रक्कम मोठ्या प्रमाणावर बँकेच्या खातेधारकांच्या खात्यामध्ये जमा होत आहे.

**एस.एम.एस. (SMS) बँकींग सुविधा :** बँकेच्या सर्व शाखांमधून खातेधारांना त्यांचे खात्यावर झालेल्या व्यवहाराची सुचना खातेधारकांनी रजिस्टर केलेल्या मोबाईलवर SMS च्याद्वारे पाठविली जाते. खात्यावरील व्यवहारा शिवाय बँकेचे कार्यक्रम, उपक्रम, नविन योजना, ठेवीची मुदत संपत असलेली सूचना, वाढदिवस शुभेच्छा इत्यादी माहिती एस.एम.एस.द्वारे पाठविली जाते. तेव्हा नमुद सुविधेचा लाभ घेण्यासाठी ज्या खातेधारकांनी आपला मोबाईल नंबर आपल्या खात्यात रजिस्टर केला नसेल त्यांनी तो अवश्य करावा.

**सर्वत्र कार्ड सेफ ॲप सुविधा :** बँकेच्या सर्व रूपे ए.टी.एम. कार्ड धारकांकरीता बँकेने कार्ड सेफ ॲप सुविधा सुरू केली असून बँकेच्या सर्व ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, सदर सुविधे मध्ये आपल्या खात्यातून ए.टी.एम., पि.ओ.एस., ई–कॉम मधील रकमेची मर्यादा कमी किंवा जास्त करण्याची सोय ग्राहकांच्या हाती आहे तसेच सदर सुविधेमध्ये केव्हाही ग्राहक त्याच्या ए.टी.एम.चा पिन बदलु शकतो. सदर सुविधेमुळे सायबर गुन्हेगारी पासून ग्राहक स्वत:च्या खात्याची सुरक्षा स्वत: करू शकतो.

**मिस कॉल सुविधा :** ग्राहकाने स्वत:च्या खात्यातील रजिस्टर मोबाईल नंबर वरून ९६८७७६८८९९ या नंबर वर मिस कॉल दिल्यास खात्यातील शिल्लक रक्कमेची माहिती ताबडतोब ग्राहकाला एस.एम.एस. द्वारे प्राप्त होते.

**चेक ट्रंकेशन सिस्टिम (CTS) सुविधा :** रिझर्व्ह बँकेने क्लिअरींगच्या पुर्वापार चालू असलेल्या पध्दती मध्ये चेक कलेक्शनसाठी लागणारा वेळ, क्लिअरींग मध्ये होणाऱ्या फसवणुकी व गैरव्यवहार टाळण्यासाठी चेक ट्रंकेशन सिस्टिम चालु केली आहे. नमूद CTS योजना आपल्या बँकेने बँकेच्या सर्व शाखांमध्ये चालू केली आहे. या सुविधेकरीता बँकेने IDBI बँकेची सबमेंबरशिप घेतली आहे.

**पॅन कार्ड (PAN) सुविधा :** आपली बँक (UTI Infrastructure Technology & Services Limited) या कंपनीचा पॅन कार्ड व्यवसाय प्रतिनिधी आहे. ह्या करीता रिझर्व्ह बँकेने परवानगी पूर्वीच दिलेली आहे. सध्या सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारासाठी अत्यावश्यक असलेले PAN CARD काढून देण्याची सुविधा बँकेच्या सर्व शाखांमध्ये त्वरीत उपलब्ध आहे. बँकेच्या प्रत्येक बचत, चालू, ठेवीदार व कर्जदार हा पॅन कार्ड धारक असणे आवश्यक आहे.

**ए.टी.एम. (ATM) सुविधा :** आपल्या बँकेने HDFC बँकेमार्फत (NPCI) नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचे कडून सबमेंबरशिप घेवून मार्च २०१७ पासून रूपे डेबिट कार्डची (RUPAY DEBIT CARD) सुविधा आपल्या खातेधारकांना दिलेली असून या सुविधेस ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. बँकेच्या खातेधारकांना देशातील कोणत्याही बँकेच्या ATM मधून नगद राशी काढता येत आहे. तसेच कॅशलेस व्यवहार करण्यासाठी बँकेचे RUPAY DEBIT CARD चा वापर खातेधारकांना मॉल, पेट्रोल पंप, बिग बाजार, डी–मार्ट, बेस्ट प्राईज, इत्यादी ठिकाणी खरेदी करण्यासाठी उपयोग करता येईल.

**ई–कॉम (E-COM) सुविधा :** नमुद सुविधा बँकेने मार्च २०१७ पासूनच आपल्या ATM CARD खाते धारकांना सुरू केली आहे. सुविधे अंतर्गत खातेदार ऑनलाईन खरेदी, इलेक्ट्रीक बिल भरणा, फोन बिल भरणा, विमा भरणा, रेल्वे रिझर्वेशन, मोबाईल रिचार्ज इत्यादी सुविधेचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करीत आहेत.

**आय.एम.पी.एस (IMPS DR/CR) सुविधा :** IMPS (Immediate Payment System) ही सुविधा बँकेने मार्च २०१७ पासून बँकेच्या ग्राहकांसाठी सुरू केली आहे. या सुविधेमध्ये खातेदाराला बँकेत जावून P2P म्हणजे MMID व MOBILE NO सांगून रक्कम पाठविता किंवा बोलविता येते तसेच P2A म्हणजे IFSC CODE, MOBILE NO सांगून रक्कम पाठविता किंवा बोलविता येते.

**मोबाईल बँकींग सुविधा :** आपल्या बँकेने मोबाईल बँकींग सुविधा जानेवारी २०१८ पासून सुरू केली असून सदर सुविधेमध्ये खातेदार कुठुनही (२४ × ७ × ३६५) बँकींग व्यवहार करू शकतो.

**भारत बिल पेमेंट सुविधा (BBPS) :** ग्राहकांची गरज लक्षात घेता बँकेच्या सर्व शाखांमधून विद्युत बिल, फोन बिल, डिटीएच रिचार्ज, लॅन्डलाईन बिल इत्यादी बिलांचा भरणा करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यामुळे ग्राहकांची बँकेत विशेष सोय झालेली आहे.

**Fastag सुविधा :** जानेवारी २०२० पासुन आपल्या बँकेमध्ये वाहन धारकांसाठी Fastag सुविधा सुरू करण्यात आली असुन ग्राहक त्याचा लाभ घेत आहे.

**७/१२, ८ अ सुविधा :** आपल्या बँकेमध्ये Digital ७/१२, ८ अ नमुना सुविधा सुरू करण्यात आली असुन ग्राहक मोठया संख्येने त्याचा लाभ घेत आहे.

**UPI सुविधा :** आपल्या बँकेने नुकतीच Inward UPI सिस्टीम चालु केली आहे. लवकरच बँक आपल्या ग्राहकांना नवीन एटीएम कार्ड सह UPI सुविधा देणार आहे.

**आपला ग्राहक जाणून घ्या (Know Your Customer-KYC) :** रिझर्व्ह बँकेने बँकेत उघडण्यात येणाऱ्या खात्या संबंधी वेळोवेळी के.वाय.सी. विषयी विविध मार्गदर्शक सुचना लागू केल्या आहेत. ज्याचे आपली बँक पालन करीत आहे. तरी भागधारकांना विनंती करण्यात येते की, ज्या भागधारकांनी अद्यापही KYC Norms ची पूर्तता केली नसेल त्यांनी त्वरीत पूर्तता करून बँकेला सहकार्य करावे. रिझर्व्ह बँकेने प्रत्येक खातेदाराचे PAN CARD सह आधार कार्ड घेणे अनिवार्य केले आहे.

**डिपॉझीट एज्युकेशन ॲन्ड अवेरनेस फंड (DEAF):** RBI च्या DEAF अंतर्गत गेल्या १० वर्षात केवळ व्याज वगळता अन्य कोणताही व्यवहार झाला नसल्यास अशी खाती तसेच अनामत प्रकरणातील अन्य खाती व त्यामधील रक्कम रिझर्व्ह बँकेच्या DEAF खात्यात वर्ग करावी लागते. मार्च २०२३ अखेर बँकेतील एकूण ३५८० खातेधारकांची एकूण रक्कम रू. ३२,१६,६५६.५५ मात्र रिझर्व्ह बँकेला वर्ग केली आहे. अश्या खातेधारकांची माहिती बँकेच्या वेबसाईट व बँकेच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध आहे. यापुढेही वेळोवेळी मागील १० वर्षात व्यवहार नसलेली खात्याची रक्कम रिझर्व्ह बँकेला वर्ग करावी लागणार आहे, तेव्हा सर्व सभासद व खातेधारकांनी त्यांचे खात्यावर नियमित व्यवहार करावेत.

**ठेव विमा :** रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित धोरणानुसार बँकेच्या ठेवीदारांना आता दि. ४ फेब्रुवारी २०२० पासून रू. ५ लाखाचा विमा कवच प्राप्त झाला आहे त्यामुळेच बँकेच्या सर्व खातेदारांना आर्थिक सुरक्षा प्राप्त होत आहे. बँकेने आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता एकूण प्रिमियम रू. ३६,५४,४५३.९० भरला आहे तसेच बँकेमधील सर्व ठेवीचा विम्याचे प्रिमियम बँक नियमित DICGC ला पाठवित आहे.

**संचालक मंडळ :** बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी बँकेच्या सर्व शाखांसाठी पालक संचालक नियुक्त करून त्यांना शाखांचे नेतृत्व देण्यात आले आहे तसेच बँकेच्या व्यवसायात व व्यवस्थापनाच्या सुलभतेसाठी बँकेच्या उपसमितीचे सभाध्यक्ष पद संचालकांना देण्यात आले आहे. संचालकांचा बँकेच्या कामकाजात जास्तीत जास्त सहभाग अश्याप्रकारे वाढविण्यात आला आहे. स्पर्धात्मक दृष्टीकोन ठेऊन कार्यक्षमता वाढविण्यासाठी संचालक मंडळ दक्ष असून नवनवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी, नेतृत्व कौशल्य विकसित करण्यासाठी, रिझर्व्ह बँक व सहकार खात्याच्या धोरणानुसार भविष्यातील वाटचाल व दिशा ठरविण्यासाठी संचालक मंडळ विविध संस्थांच्या बँकिंग विषयक कार्यशाळां मध्ये सहभागी होऊन स्वतःच्या क्षमतांचा विकास करित आहे. बँकेची आजपर्यंतची वाटचाल संचालक मंडळाच्या एकवाक्यतेमुळे झाली असून व्यवसायीक दृष्टीकोन, आर्थिक शिस्त व पारदर्शकता हाच आमच्या कामगिरीचा भरभक्कम आधार आहे. त्यामुळे धोरण आखणी, अंमलबजावणी व व्यवसाय वाढीमध्ये उत्साह दिसून येत आहे. बँकेचे संस्थापक संचालक मा. श्री हुकमचंदजी डागा यांचे कुशल मार्गदर्शन उत्साहपूर्ण सहभाग संचालक मंडळास प्राप्त झाला आहे. अहवाल वर्षात

संचालक मंडळाच्या एकूण १३ सभा झाल्या आहेत तसेच कर्ज समिती, गुंतवणुक समिती, खर्च समिती, ए.एल.एम. समिती, ऑडीट समिती, कर्मचारी समिती यांच्या एकूण ८९ सभा झाल्या आहेत.

**कर्मचारी व्यवस्थापन :** सदैव उत्साही जबाबदारीची जाणीव ठेवणारा उच्चशिक्षित कर्मचारी वर्ग हा बँकेच्या प्रगतीमधील एक महत्वाचा घटक असून कर्मचाऱ्यांचे बँकेच्या कामकाजात मोलाचे स्थान आहे. कर्मचारी वर्ग प्रशिक्षित व अद्ययावत असण्यासाठी त्यांना दरवर्षी प्रशिक्षणासाठी पाठविले जात आहे. यासाठी बँकींग कार्यशाळा आयोजित करुन अद्ययावत प्रशिक्षणाद्वारे कर्मचारी वर्गाची तयारी करुन घेतली जाते व त्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करण्यात येते. कर्मचारी व त्यांच्या परिवाराची मेडीक्लेम पॉलीसी बँकेने काढली असून दरवर्षी नियमित प्रिमियम भरणा केला जात आहे. कर्मचारी वर्गात टीमवर्क ची भावना निर्माण व्हावी यासाठी ड्रेस कोड, आय. डी. कार्ड देण्यात आले आहे. वाढती महागाई लक्षात घेऊन कर्मचारी वर्गास वेळोवेळी महागाई भत्तात वाढ करण्यात येत आहे.

**सामाजिक बांधिलकी :** बँकिंग व्यवसाय समाजाभिमुख असला पाहिजे सदैव याची जाण बँकेच्या संचालक मंडळाने अगदी बँकेच्या स्थापने पासून सतत बाळगली आहे. त्या दृष्टीकोनातून नेहमी वेगवेगळ्या सेवा कार्य करण्याकरीता संचालक मंडळ अग्रेसर राहिले आहे त्या दृष्टीकोनातून बँकेने कल्याण निधी व चॅरिटी फंड उभा केला आहे व दरवर्षी नफ्यातून काही भाग या निधीकडे वळविण्यात येतो. या निधीतून येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीक संकटांना मदत करण्यात येते. सामाजिक बांधीलकीच्या नात्याने बँकेने सामाजिक, सांस्कृतिक इ. क्षेत्रात अनेक संस्थांना त्यांच्या कार्यात आर्थिक योगदान देऊन आपला सक्रिय सहभाग घेतला आहे.

**बँकेचे सन २०२३-२४ करीता व्यवसायाचे उद्दिष्ट :** बँकेने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता रू. ३४० कोटीच्या ठेवी, रू. २२१ कोटीच्या कर्जासह एकूण व्यवसाय रू. ५६१ कोटीचे उद्दिष्ट ठेवले आहे.

**सभासद शिक्षण व प्रशिक्षण कार्यशाळा :** केंद्र शासनाच्या ९७ व्या घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने सहकारी कायद्यात जे बदल झाले त्यामध्ये महत्वाचा बदल म्हणजे संचालक, भागधारक व कर्मचारी यांना शिक्षण व प्रशिक्षण देणे अनिवार्य झाले आहे. त्यानुसार बँक वेळोवेळी संचालक, कर्मचारी यांना रिझर्व बँक, फेडरेशन, असोसिएशन व इतर संस्थेकडून प्रशिक्षणाची सोय करत आहे तर भागधारकांना सर्व साधारण सभेत बँकिंग प्रशिक्षणाची व्यवस्था करत आहे.

**सल्लागार मंडळ :** बँकेच्या ७ शाखांवर विविध क्षेत्रातील नामवंत लोकांचे सल्लागार मंडळ बँकेला लाभले आहे. त्यांचे यथोचित मार्गदर्शन बँकेला वेळोवेळी मिळत आहे तसेच शाखा स्तरावर पालक संचालकाची नेमणूक करून त्यांच्या मार्गदर्शनात सल्लागार मंडळ कार्य करीत आहे.

**मान्यवरांच्या भेटी :** या आर्थिक वर्षात विविध मान्यवरांनी बँकेस सदिच्छा भेट देऊन बँकेच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. पोलिस महानिरीक्षक श्री. जयंतजी नाइकनवरे साहेब, पोलिस उपायुक्त श्री. नवीनचंद्रजी रेड्डी साहेब, आयकर विभाग संचालक श्री. संदीपकुमारजी साळुंके साहेब (IRS), सहसंचालक आयकर विभाग डॉ. कौमुदी पाटील मॅडम (IRS), अमरावती महानगर पालिका आयुक्त डॉ. प्रविणजी आष्टीकर साहेब, पोलिस उप-आयुक्त, अमरावती मा. श्री. विक्रमजी साळी साहेब, आयकर विभाग उपायुक्त श्री. रविंद्रजी सोनी साहेब इत्यादी यांचा समावेश आहे.

**आभार :** बँकेचे भागधारक, ठेवीदार, ग्राहक व हितचिंतक यांच्या स्नेह व सक्रीय सहभागामुळे बँकेच्या प्रगती पथावरील ही वाटचाल सुव्यवस्थीत होऊ शकली याची विनम्र जाणीव मला आहे. माझ्या सहकारी संचालकांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे बँकेच्या प्रगतीत मी योगदान देऊ शकलो. भारतीय रिझर्व्ह बँक, नागपूरचे मा. महाप्रबंधक, सह महाप्रबंधक व त्यांचे सहकारी, सहकार आयुक्त श्री. अनिलजी कवडे साहेब(I-AS), विभागीय सह निबंधक श्री. विनायकजी कहाळेकर साहेब, विभागीय सह निबंधक (अंकेक्षण) मा. श्री. सुदामजी रोडगे साहेब, अर्बन बँक विभागाचे सहनिबंधक श्री आनंदजी कटके साहेब तसेच जिल्हा उपनिबंधक मा. श्री शंकरजी कुंभार साहेब तसेच जिल्हा विशेष लेखा परिक्षक श्री. जगदीश गवळे साहेब, तालुका उप निबंधक श्री. राजेंद्रजी भुयार साहेब, सहाय्यक निबंधक गुडधे मॅडम, व श्री. भालचंद्र पारिसे साहेब व त्यांचे

सहकारी यांचे बँकेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य प्राप्त झाले आहे. या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो. बँकेच्या पॅनलवरील सर्व मालमत्ता मुल्यांकक, वकील, सोने तपासनीस यांचे पण आभार व्यक्त करतो. बँकेचे संस्थापक मा. श्री. हुकमचंदजी डागा, बँकेचे उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी बरडिया, व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष व भारतीय जैन संघटनेचे विश्वस्त श्री सुदर्शनजी गांग तसेच बँकेच्या सहकारी संचालकाकडून वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य मिळाले आहे.

पत्रकारिता पवित्र राष्ट्रीय कार्य आहे. वस्तुस्थिति व वास्तविकतेचे दर्शन समाजापर्यंत पोहचवण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. अभिनंदन बँके कडून सतत विकासात्मक अर्थकारण आणि सामाजिक उत्थान करण्याचा प्रयत्न केला जात आहे व या माध्यमातून राष्ट्रबांधणीकरीता खारीचा वाटा उचलण्याचे कर्तव्य संपन्न होत आहे. बँकेद्वारा राबविण्यात येणारे अनेक आर्थिक व सामाजिक उपक्रमास विविध वृत्तपत्रांचे आदरणीय संपादक आणि पत्रकारबंधु बातम्यांच्या रूपाने समाजापर्यंत तत्परतेने नेहमी पोहोचवतात. बँक आणि ग्राहक यांच्यातला दुवा बनून ग्राहकांच्या मनात अतूट विश्वास निर्माण करतात. विविध प्रिंटर्स व इलेक्ट्रिनिक्स मीडिया चे मिळत असलेल्या सकारात्मक सहकार्याबद्दल हार्दिक आभार व मन:पुर्वक धन्यवाद व्यक्त करतो.

बँकेच्या २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सभासद बंधु–भगिनी यांचे प्रती आभार व्यक्त करुन भविष्यात सर्वांचा सहयोग प्राप्त होईल अशी आशा व्यक्त करतो.

**ॲड.विजय बोथरा**
अध्यक्ष

## ।। आमंत्रण ।।

**रविवार दि. ०६ ऑगस्ट २०२३** रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर श्री जैन छात्रालय येथे स्वरूची भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे यासाठी आपण अगत्यपूर्वक आमंत्रित आहात.

– आपले विनीत–
अध्यक्ष व संचालक मंडळ

## संचालक मंडळ



**डाव्या बाजुने श्रीमती किरण जैन, सौ. सरला भंसाली, नवीन चोरडिया, अरूण कडू, किशोर बोकरिया, हुकमचंद डागा, ॲड. विजय बोथरा, सुदर्शन गांग, डॉ. सुरेंद्र बरडिया, राजेंद्र सिंघई, कंवरीलाल ओस्तवाल, राजेंद्र भंसाली, गौरव लुनावत, सुनिल सरोदे, शंकर शिंदे**

# अंदाज पत्रक

## खर्च

### सन २०२२-२३ मध्ये मंजुर अंदाज पत्रका पेक्षा कमी जास्त झालेला खर्च व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षासाठी खर्चाचा अंदाज

| तपशिल | अपेक्षित खर्च २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च | जास्त झालेला खर्च | कमी झालेला खर्च | सन २०२३-२०२४ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी व कर्जावरील व्याज | १५,७०,००,०००=०० | १३,५५,२६,५७२=९८ | ०.०० | २,१४,७३,४२७=०२ | १६,००,००,०००=०० |
| पगार, भत्ते, ग्रॅच्युईटी व भविष्य निर्वाह निधी | ३,००,००,०००=०० | ३,१०,७८,८९१=०० | १०,७८,८९१=०० | ०.०० | ३,४०,००,०००=०० |
| भाडे,कर,विमा व दिवाबत्ती | १,०५,००,०००=०० | ९८,८६,३७०=६२ | ०.०० | ६,१३,६२९=३८ | १,१०,००,०००=०० |
| पोस्टेज व टेलीफोन | ४,००,०००=०० | ३,५८,५५१=५८ | ०.०० | ४१,४४८=४२ | ४,००,०००=०० |
| स्टेशनरी व जाहिरात | १०,००,०००=०० | १०,५३,२३१=२२ | ५३,२३१=२२ | ०.०० | ११,००,०००=०० |
| अंकेक्षण शुल्क | ११,००,०००=०० | १२,३८,६२८=०० | १,३८,६२८=०० | ०.०० | १३,००,०००=०० |
| घसारा व दुरुस्ती | ४५,००,०००=०० | ३८,०८,१८५=१९ | ०.०० | ६,९१,८१४=८१ | ४६,००,०००=००० |
| कोर्ट खर्च | २,००,०००=०० | ५००.०० | ०.०० | १,९९,५००=०० | २,००,०००=०० |
| तरतूद | १,२०,००,०००=०० | १,०४,०६,९७२=०० | ०.०० | १५,९३,०२८.०० | १,२०,००,०००=०० |
| आधुनिक तंत्रज्ञानावरील खर्च | ३५,००,०००=०० | ३९,१०,९०१=५० | ४,१०,९०१=५० | ०.०० | ४०,००,०००=०० |
| इतर खर्च | ४५,००,०००=०० | ५१,८९,२७५=३९ | ६,८९,२७५=३९ | ०.०० | ५४,००,०००=०० |
| संचालक सभा व प्रशिक्षण खर्च | ५,००,०००=०० | ३,३५,०३३=५० | ०.०० | १,६४,९६६=५० | ५,००,०००=०० |
| रौप्य महोत्सव कार्यक्रम | ०.०० | ११,४६,८५२=८८ | ११,४६,८५२=८८ | ०.०० | ०.०० |
| **एकूण** | **२२,५२,००,०००=००** | **२०,३९,३९,९६५=८६** | **३५,१७,७७९=९९** | **२,४७,७७,८१४=१३** | **२३,४५,००,०००=००** |
| **नफा** | **६,१४,५०,०००=००** | **६,५७,५२,७६८=५६** | **०.००** | **०.००** | **६,७५,००,०००=००** |
| एकूण खर्च | २८,६६,५०,०००=०० | २६,९६,९२,७३४=४२ | ३५,१७,७७९=९९ | २,४७,७७,८१४=१३ | ३०,२०,००,०००=०० |

# अंदाज पत्रक

## उत्पन्न

### सन २०२२-२३ मध्ये मंजुर अंदाज पत्रका पेक्षा कमी जास्त मिळालेले उत्पन्न व सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षासाठी उत्पन्नाचा अंदाज

| तपशिल | अपेक्षित उत्पन्न २०२२-२०२३ | प्रत्यक्ष उत्पन्न | जास्त मिळालेले उत्पन्न | कमी मिळालेले उत्पन्न | सन २०२३-२०२४ चा अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| कर्ज व गुंतवणुकीवरील व्याज | २७,२८,५०,०००=०० | २५,८६,९७,४५४=९० | ०.०० | १,४१,५२,५४५=१० | २८,८०,००,०००=०० |
| | | | | | |
| | | | | | |
| कमिशन | ६,००,०००=०० | ७,८१,०३१=१९ | १,८१,०३१=१९ | ०.०० | ८,००,०००=०० |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| इतर उत्पन्न | १,३२,००,०००=०० | १,०२,१४,२४८=३३ | ०.०० | २९,८५,७५१=६७ | १,३२,००,०००=०० |
| | | | | | |
| | | | | | |
| एकूण उत्पन्न | २८,६६,५०,०००=०० | २६,९६,९२,७३४=४२ | १,८१,०३१=१९ | १,७१,३८,२९६=७७ | ३०,२०,००,०००=०० |
| | | | | | |

# ABHINANDAN URBAN CO-OP BANK LTD., AMRAVATI

## FORM "A"

## ताळेबंद

## BALANCE SHEET AS ON 31st MARCH 2023

| S.N. | PARTICULARS | विवरण | Schedule | As on 31-03-2023 | As on 31-03-2022 |
|---|---|---|---|---|---|
| i | **CAPITAL & LIABILITIES** | **भांडवल व देयता** | | | |
| | Capital | भांडवल | १ | ५,१७,१७,०००.०० | ४,९४,८७,०००.०० |
| | Reserves and Surplus | राखीव व इतर निधी | २ | ३९,७७,२६,७९८.६० | ३५,०२,९२,१७९.०४ |
| | Deposits | ठेवी | ३ | २९७,९६,०२,०९०.९७ | २६९,८४,३६,३९४.८० |
| | Borrowings | बाहेरील कर्जे | ४ | ०.०० | ०.०० |
| | Other Liabilities and provisions | इतर देणी आणि तरतूद | ५ | ७,५१,७५,२९२.५४ | ४,३३,१५,१७७.१२ |
| | **Total** | **एकूण** | | **३५०,४२,२१,१८२.११** | **३१४,१५,३०,७५०.९६** |
| ii | **ASSETS** | **जिंदगी व येणी** | | | |
| | Cash and Balances with Reserve Bank of India | रोख व आरबीआय कडील शिल्लक | ६ | ३,२९,९०,०३२.०० | ३,२६,८१,८८०.०० |
| | Balance with Banks and money at call and short notice | इतर बँकांतील शिल्लक | ७ | १७,१०,१२,८०१.१४ | ११,९६,११,९१३.९७ |
| | Investments | गुंतवणूक | ८ | १२९,१४,४०,४५२.०३ | १२१,५७,८६,०५१.०० |
| | Advances | दिलेली कर्जे | ९ | १८३,८९,०२,३५४.८५ | १६३,५७,२०,१२१.४६ |
| | Fixed Assets | स्थावर मालमत्ता | १० | ११,००,०७,८२७.३९ | ८,२५,८३,९६६.०७ |
| | Other Assets | इतर जिंदगी | ११ | ५,९८,६७,७१४.७० | ५,५१,४६,८१८.४६ |
| | **Total** | **एकूण** | | **३५०,४२,२१,१८२.११** | **३१४,१५,३०,७५०.९६** |
| | Contingent Liabilities | संभवनीय/आकस्मित देणी | १२ | ३,६५,६९,९७८.५५ | २,४२,५५,१६१.९० |
| | Bills for collection | बिल कलेक्शन | - | ०.०० | ०.०० |

**मे.शहा बाहेती चांडक अॅन्ड कंपनी**
वैधानिक लेखा परिक्षक

**डॉ. सुरेंद्र स्वरूपचंदजी बरडिया**
उपाध्यक्ष

**अॅड. विजय सुगनचंदजी बोथरा**
अध्यक्ष

**शिवाजी गुलाबराव देठे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**राजेंद्र हस्तीमलजी भंसाली**
संचालक

**सुदर्शन पुखराजजी गांग**
संचालक

# ABHINANDAN URBAN CO-OP BANK LTD., AMRAVATI

## FORM "B"

## नफातोटा

## PROFIT & LOSS AS ON 31st MARCH 2023

| S.N. | PARTICULARS | विवरण | Schedule | As on 31-03-2023 | As on 31-03-2022 |
|---|---|---|---|---|---|
| i | **INCOME** | **उत्पन्न** | | | |
| | Interest earned | कर्ज व गुंतवणूकीवरील मिळालेले व्याज | १३ | २५,८६,९७,४५४.९० | २४,३७,६८,२७१.१७ |
| | Other Income | इतर उत्पन्न | १४ | १,०९,९५,२७९.५२ | १,५०,४४,१०४.३७ |
| | **Total** | **एकूण** | | **२६,९६,९२,७३४.४२** | **२५,८८,१२,३७५.५४** |
| ii | **EXPENDITURE** | **खर्च** | | | |
| | Interest expended | ठेवीवर दिलेले व्याज | १५ | १३,५५,२६,५७२.९८ | १३,१४,२२,५४८.५७ |
| | Operating expenses | प्रशासकीय खर्च | १६ | ८,२६,५४,९७७.८८ | ७,०४,३६,१४४.०३ |
| | Provisions and contingencies | तरतूदी व इतर | १७ | १,०४,०६,९७२.०० | २,०८,१५,६९६.०० |
| | **Total** | **एकूण** | | **२२,८५,८८,५२२.८६** | **२२,२६,७४,३८८.६०** |
| iii | **PROFIT** | **नफा** | | | |
| | Net Profit /Loss(-) for the year | निव्वळ नफा | | ४,११,०४,२११.५६ | ३,६१,३७,९८६.९४ |
| | **TOTAL** | **एकूण** | | **२६,९६,९२,७३४.४२** | **२५,८८,१२,३७५.५४** |
| iv | **APPROPRIATIONS (Subject to AGM approval)** | **विनियोग** | | | |
| | Transfer to Statutory Reserves | राखीव निधी वर्ग | | १,०५,००,०००.०० | ९१,००,०००.०० |
